पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

■ वर्ष १ ■ अंक ३३ ■ सोमवार दि. ६ जुलै २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## » थोडक्यात

### पुण्यात अख्ख कुटुंब ढिगाऱ्याखाली

**पुणे :** पुण्यातील मावळ तालुक्यातील पाठण गावात दुर्दैवी घटना घडलीये. अतिवृष्टीमुळे विसापूर किल्ल्याचा एक भाग कोसळून या गावातील एक कुटुंब गाडलं गेलंय. नंदू तिकोणेंच्या कुटुंबावर काळरात्र चालून आलीये. नंदू तिकोने, पत्नी आणि मुलगा घरात असताना काळानं घाला घातला. या तिघांचा शोध सुरू असून एनडीआरएफ पथकाकडून बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंतएकाचा मृतदेह सापडला आहे. ही घटना ६ जुलैच्या पहाटेच्या सुमारास घडली.

---

### पावसाचं रौद्ररूप पुणे जिल्ह्यात अतिवृष्टी

**पुणे :** लोणावळ्यात २४ तासांत तब्बल ६७० मिमी पाऊस सुरू आहे. आज सकाळी ६.३० पर्यंतच्या २४ तासांत ६७० मिमी पाऊस झालाय. भिरामध्ये ६०९ मिमी, ताम्हिणी घाटात ५८० मिमी पाऊस, तर मावळ तालुक्यातील शिरगावला ५४० मिमी पाऊस कोसळलाय. लोणावळा-लवासा दरम्यानच्या आंबोश्यात ५३७ मिमी पाऊस, तर खोपोलीत २४ तासांत ५१६ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# 'इफ्रॉमॅनचा डिझास्टर मॅन झाला' -हर्षवर्धन सपकाळ

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावरील मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळले

## मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळल्यानंतर विरोधकांनी देवेंद्र फडणवीसांना घेरलं





प्रतिनिधी | ६ जुलै

**मुंबई :** लोणावळ्यातील मुसळधार पावसामुळे प्रचंड गाजावाजा करुन उभारण्यात आलेल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावरील मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळल्याची घटना घडली होती. हा स्लॅब कोसळून माती आणि पाण्याचा लोंढा थेट मिसिंग लिंकच्या रस्त्यावर आला होता. काही दिवसांपूर्वीच मिसिंग लिंकवर काही खड्डे पडल्याचे फोटो व्हायरल झाले होते. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंजिनिअरिंग टेक्निक सांगत विरोधकांना फटकारले होते. पहिल्या पावसात रस्त्याच्या ड्युराबिलिटी आणि इतर गोष्टींची टेस्ट होते, असा युक्तिवाद फडणवीसांनी केला होता. मात्र, सोमवारी मिसिंग लिंकच्या एन्ट्री पॉईंटजवळ स्लॅबलाच भगदाड पडल्याने विरोधकांनी देवेंद्र फडणवीस यांना घेरले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले आहे की, 'पहिल्याच पावसात! दोन खड्ड्यांना 'पहिल्या पावसाचं टेस्टिंग' म्हणणारे मुख्यमंत्री, आता मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेच्या हजारो कोटींच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पावर दरड कोसळून रस्ता बंद झाल्यालाही 'मान्सून ट्रायल' म्हणणार का? जगभर डोंगर फोडून बोगदे उभे राहतात, पण महाराष्ट्रात पहिल्याच पावसात प्रकल्प कोसळतात. कारण समस्या पावसाची नाही, तर निकृष्ट कामांची, भ्रष्टाचाराची आणि कंत्राटदारांना मिळणाऱ्या राजकीय अभयाची आहे. हजारो कोटींचे प्रकल्प... पण पहिल्याच पावसात विकासच 'मिसिंग',' अशी टीका त्यांनी केलीय.

काँग्रेस नेते सतेज पाटील म्हणाले की, 'मिसिंग लिंकवरून सुरू असलेलं क्रेडिट वॉर आपण बघितलं आहे. आताच्या परिस्थितीचे देखील क्रेडिट यांनी घ्यावे. पावसाचा ऑरेंज अलर्ट होता आधी सांगायला पाहिजे होतं, मात्र नियोजन कुठेही दिसलं नाही. वाहतूक रखडणे, अपघात होताना द्रुतगती महामार्गावर दिसतात. हे फेल्युअर ऑफ गव्हर्नन्स आहे. मंत्री म्हणतात अजून परिस्थिती खराब होणार आहे, प्रचंड प्रमाणात पाऊस पडणार आहे. गैरसोय होऊ नये म्हणून सांगायला पाहिजे होतं ना. हे संवेदनहीन सरकार आहे. पुण्याहून मुंबईला येणारे मार्ग बंद आहे. सरकारनं कंट्रोल रुमच्या माध्यमातून काय घडते आहे हे बघणं गरजेचं आहे. अधिकारी, कर्मचारी कामकाजासाठी पोहोचले आहेत. सरकारनं आधी निवेदन करावं, उपाययोजना काय? हे सांगावं, किती मृत्यू झाले, मुंबई पुणे महामार्ग कधी सुरू होणार? हे सांगावे,' असे त्यांनी म्हटले.

### 'विकास मिसिंग' लिंक रोड : रोहिणी खडसे

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे म्हणाल्या की, 'मिसिंग लिंक रोड नव्हे तर 'विकास मिसिंग' लिंक रोड! पुणे–मुंबई द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचा मोठा गाजावाजा झाला. दोनच महिन्यांपूर्वी मोठ्या थाटामाटात या रोडचा उद्घाटन सोहळा पार पडला. पण पहिल्याच पावसात या रोडवर खड्डे पडले. त्यावर लोकांनी प्रश्न विचारला तर 'ट्रायल सुरू होती,' असं सांगितलं गेलं. आज थेट दरड कोसळून वाहतूक बंद झाली आहे. खरंतर महायुती सरकारचा विकास जाहिरातींमध्येच दिसतो. प्रत्यक्षांत मात्र 'विकास' मिसिंग आहे! जनतेच्या पैशातून उभारलेले प्रकल्प टिकाव धरत नसतील, तर तो विकास नसून जनतेच्या विश्वासाशी केलेला खेळ आहे,' असे टीका त्यांनी केलीय.

### हे सरकार टक्केवारीचे : विजय वडेट्टीवार

» काँग्रेस नेते विजय वड्डेटीवार म्हणाले की, 'मिसिंग लिंक असेल किंवा इतर ठिकाणी दरड कोसळणे, हे सरकार टक्केवारीचे आहे. टक्केवारी घेतल्याने सरकारकडूनही काहीही होणार नाही. सर्व काही मनगटाला रेटून कामं सुरू आहेत,' असा घणाघात त्यांनी केलाय.

# ध्येय गाठायचे असल्यास अभ्यासाशिवाय पर्याय नाही- पंकज देशमुख

## सनशाइन किड्स कॉन्व्हेंट चे मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी | ६ जुलै



अकोला- जीवनात आपले ध्येय साध्य करायचे असल्यास कठोर अभ्यासाशिवाय पर्याय नाही असे मत समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ अकोला चे सचिव माननीय पंकज देशमुख यांनी व्यक्त केले संस्थेतर्फे गायत्री नगर परिसरात नव्याने सनशाइन किड्स कॉन्व्हेंट सुरू करण्यात आली त्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून मातोश्री इंदुमती देशमुख उपस्थित होत्या तर अन्य मान्यवर अतिथी म्हणून संस्थेचे माजी अध्यक्ष सिद्धेश्वर देशमुख उपस्थित होते. प्रतिमापूजनाने व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

संस्थेतर्फे उपस्थित सर्व अतिथींचे स्वागत गुलाब पुष्पाचे रोपटे देऊन करण्यात आले. नव्यानेच प्रवेश घेतलेल्या मुलांचे प्रवेशद्वारावर टिळा लावून व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले याप्रसंगी कॉन्व्हेंट च्या प्रवेशद्वाराला रंगीबेरंगी फुग्यांची सजावट करण्यात आली होती.

याप्रसंगी संस्थेचे माजी अध्यक्ष सिद्धेश्वर देशमुख यांनी सुद्धा उपस्थिताना मार्गदर्शन केले. मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते सनशाइन किड्स कॉन्व्हेंट चे रिबीन कापून उद्घाटन करण्यात आले. मा गायत्री प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते गणवेश वाटप सुद्धा करण्यात आले. सनशाइन किड्स मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांना नवनवीन खेळणी तसेच टिफिन खाण्यासाठी बेंच व खुर्च्या पाहून त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ मुख्याध्यापक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक शिक्षक रामेश्वर बुंदेले, चंदा रोकडे, मीना काटे, वर्षा हिवराळे, वैशाली इंगळे, उज्वला सोळंके कीर्ती पोके या शिक्षकांसहित अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी चंद्र नील देशपांडे योगेश लंगोटे रणजीत ठाकूर आदींनी अथक परिश्रम केले.

# मानखुर्दमध्ये तीन मजली चाळीचा भाग कोसळला!

## ५ चिमुकल्यांसह ६ जणांचा जागीच मृत्यू

राजेश जायस्वाल | ६ जुलै

**मुंबई :** राज्यभरासह मुंबई आणि उपनगरात मुसळधार पावसाचा रौद्रावतार बघायला मिळत आहे. अशातच मुंबईतील मानखुर्द भागात एका तीन मजली चाळीचा भाग कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. धोकादायक असलेली ही चाळ रिकामी करण्यासाठी घरातील सामान आवरत असतानाच अचानक पावसाने घात केला आणि संपूर्ण घर कोसळले. या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्यामुळे ५ निष्पाप लहान मुले आणि एका महिलेसह ६ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी गोवंडी रुग्णालयात जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे. तर राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी देखील घटनास्थळी भेट दिलीय. यावेळी धोकादायक इमारतींची चौकशी होणार, अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. मुंबईतील मानखुर्द भागात जनता नगर परिसरात काल, रविवार (५ जुलै २०२६) रोजी रात्री साडे आठच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी दुर्घटना घडली. जनता नगर परिसरात असलेल्या तीन मजली कच्च्या चाळीतील २ ते ३ घरे अचानक कोसळली. या दुर्घटनेत ५ लहान मुले आणि एक स्त्री अशा एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे.

# खवा, ब्रेड आणि इतर खाद्य पदार्थ फेकले नाल्यात !

प्रतिनिधी | ६ जुलै



**मालेगाव :** राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सतत कारवाया सुरू आहे.या धास्तीचे परिणाम वाशीमच्या मालेगांव मध्ये रस्त्याच्या नाल्यात खवा,ब्रेड आणि इतर खाद्य पदार्थ फेकल्याने दिसून आले.हे खाद्य कुठून आले आणि कोणी फेकले याची चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

राज्यभर अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवायांची धास्ती आता वाशिम जिल्ह्यातील मालेगाव शहरातही दिसून येत आहे. अकोला–वाशिम रोडवरील मालेगाव बायपास परिसरात रस्त्याच्या नाल्यात मोठ्या प्रमाणात खवा, ब्रेडची पाकिटे आणि इतर खाद्यपदार्थ फेकून दिल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, शहरात मोठ मोठी हॉटेल असतानाही गेल्या 28 ते 29 वर्षांत अशी परिस्थिती कधीच निर्माण झाली नव्हती.अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे ही भीती अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईची आहे का, असा प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# आषाढी वारीत वारकऱ्यांसाठी प्रथमच 'एअर ॲम्ब्युलन्स'!

## इमर्जन्सी स्थितीत वेळेत उपचार मिळणार, आरोग्य विभागाचा निर्णय

प्रतिनिधी | ६ जुलै



**पुणे :** आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्य सरकारने यंदा प्रथमच 'एअर ॲम्ब्युलन्स'ची (हेलिकॉप्टर रुग्णवाहिका) सेवा उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यासोबतच संपूर्ण पालखी मार्ग डिजिटल यंत्रणेने जोडणारे आरोग्यसंपन्न वारी हे विशेष मोबाइल ॲपही यंदा सादर वेले जाणार आहे. यामुळे वारकऱ्यांना आपत्कालीन स्थितीत तत्काळ वैद्यकीय मदत मिळणे शक्य होईल.

वारीमार्गावर आपत्कालीन स्थितीत तातडीने उपचार देण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून 'बाइक ॲम्ब्युलन्स'चा वापर करण्यात येत आहे. मात्र, हृदयविकार, पक्षाघात किंवा अपघात झाल्यास तातडीने उपचार देणे गर्दीमुळे अनेकदा शक्य होत नाही. त्यामुळे 'एअर ॲम्ब्युलन्स'चा निर्णय घेण्यात आला आहे.

### वारी मार्गावर 353 ठिकाणी आयसीयूची सुविधा

वारीदरम्यान आपत्कालीन वैद्यकीय सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी पालखी मार्गावर 353 रुग्णवाहिका, 43 ठिकाणी अतिदक्षता विभागाची (आयसीयू) सुविधा आणि 156 प्राथमिक उपचार वेंद्रे कार्यरत राहणार आहेत. पंढरपूरमध्येही अतिरिक्त आयसीयू कक्ष, महाआरोग्य शिबिर आणि 24 तास वैद्यकीय सेवा असणार आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी 3,087 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच 302 तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार दि. ६ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पावसाचा धुमाकूळ

निसर्गाचे वरदान असलेला पाऊस जेव्हा रौद्ररूप धारण करतो, तेव्हा त्याला 'पावसाचा धुमाकूळ' म्हणतात. उन्हाळ्याच्या काहिलीनंतर येणाऱ्या पावसाची आपण आतुरतेने वाट पाहत असतो, पण काही वेळा हाच पाऊस संपूर्ण जनजीवन विस्कळीत करून टाकतो. मुसळधार आणि संततधार पावसामुळे शहरांपासून ते गावांपर्यंत सगळीकडे हाहाकार माजतो.

जेव्हा पाऊस आपला धुमाकूळ सुरू करतो, तेव्हा नदी-नाले ओसंडून वाहू लागतात. रस्त्यांना नद्यांचे स्वरूप येते आणि सखल भागांत पाणी साचल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. रेल्वे आणि विमान सेवांवर याचा मोठा परिणाम होतो. चाकरमान्यांचे हाल होतात आणि कामावर जाणाऱ्या लोकांची तारांबळ उडते.

गावाकडची परिस्थिती तर अधिकच गंभीर होते. शेतात पाणी साचल्यामुळे हाताशी आलेली पिके वाहून जातात किंवा सडून नष्ट होतात. यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून निघणारे नुकसान होते. जुनी घरे, भिंती कोसळतात आणि अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या दुर्घटना घडतात. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरते. पावसाचा हा धुमाकूळ आपल्याला निसर्गाच्या शक्तीची जाणीव करून देतो.

# जलपुनर्भरणबाबत अनास्था उद्याच्या वाळवंटाची नांदी ?




आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत. तंत्रज्ञानाने प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले आहेत, पण या सगळ्या झगमगाटात आपण एका अत्यंत गंभीर आणि मूलभूत संकटाकडे डोळेझाक करत आहोत—ते म्हणजे पाण्याचे संकट. दरवर्षी उन्हाळा आला की पाणीटंचाईच्या बातम्या टीव्ही स्क्रीनवर झळकू लागतात, टँकरची संख्या मोजली जाते आणि पाण्यासाठी होणारी वणवण पाहून आपण हळहळतो. पण पाऊस सुरू झाला की, आपण हे सगळं विसरून जातो. ही जी आपली 'जलपुनर्भरण' संदर्भातली सामूहिक उदासीनता आहे, तीच खऱ्या अर्थाने उद्याच्या मोठ्या संकटाला आमंत्रण देत आहे.

**अनास्थेचे भयानक परिणाम**

केंद्रीय भूजल बोर्डाच्या अहवालानुसार भारतातील अनेक भागांमध्ये भूजल पातळी दरवर्षी काही मीटरने खाली जात आहे. जर हीच अनास्था कायम राहिली, तर पुढील काही वर्षांत अनेक शहरे 'झिरो वॉटर डे' (पाणी पूर्णपणे संपण्याचा दिवस) अनुभवतील. बोअरवेल कोरड्या पडणे: आज ५००-६०० फुटांवरही पाणी लागत नाही, याचे कारण आपण जमिनीत पाणी साठवलेच नाही.

**शेतीचे नुकसान:** भूजल पातळी खालावल्यामुळे विहिरी आटत आहेत, ज्याचा थेट फटका शेतकऱ्यांना आणि देशाच्या अन्नसुरक्षेला बसत आहे.

- पाणी जमिनीत न जिरल्यामुळे थोडे जरी जास्त पाणी पडले, तरी शहरांचे रस्ते नद्या बनतात. म्हणजेच, एकाच वेळी आपण पूर आणि पाणीटंचाई अशा दोन्ही संकटांना तोंड देत आहोत.

### निसर्गाचा नियम विरुद्ध मानवाचा हट्ट

निसर्गाचा एक साधा नियम आहे–'जे जमिनीतून घ्याल, ते जमिनीला परत द्यावे लागेल.' गेल्या काही दशकांमध्ये आपण कूपनलिका (बोअरवेल) आणि विहिरींच्या माध्यमातून जमिनीतील पाण्याचा उपसा अतोनात वाढवला आहे. पण, ते पाणी जमिनीत परत कसे जिरेल, याचा विचार आपण सोयीस्करपणे टाळला. शहरांचे काँक्रिटीकरण इतके वाढले आहे की, पावसाच्या पाण्याचा जमिनीशी संपर्कच तुटला आहे. रस्ते, सोसायट्यांचे आवार सगळं काही सिमेंट-काँक्रीटने झाकले गेले आहे. त्यामुळे पडणारा पाऊस जमिनीवर न पडता थेट नाल्यांमध्ये आणि तिथून समुद्रात वाहून जातो. आपण जणू जमिनीला प्लास्टिकचा कोट घातला आहे, ज्यातून एक थेंबही पाणी आत जाऊ शकत नाही.

- उपाय काय? अनास्था झटकून कृती करण्याची वेळ

- आता नुसती चिंता करून भागणार नाही, तर चिंतनाची जागा 'कृतीने' घेतली पाहिजे. जलपुनर्भरण ही केवळ सरकारची किंवा स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नागरिकाची चळवळ बनली पाहिजे.

**घरगुती पातळीवर सुरुवात :** आपल्या घराच्या, इमारतीच्या छतावर पडणारे पाणी पाईपद्वारे जमिनीत सोडण्याची सोपी यंत्रणा (रेन वॉटर हार्वेस्टिंग) कार्यान्वित करा.

- काँक्रीटने श्वास कोंडू नका: घराभोवतीचे अंगण पूर्णपणे सिमेंटचे न करता, तिथे पाणी जिरण्यासाठी मातीची जागा ठेवा किंवा सच्छिद्र पेव्हर ब्लॉक वापरा.

- शोषखड्डे ग्रामीण आणि शहरी भागांतही सांडपाणी किंवा पावसाचे पाणी जिरवण्यासाठी शोषखड्डे तयार करा.

- पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे, हे आपण लहानपणापासून पुस्तकात वाचत आलो आहोत, आता ते जगण्याची वेळ आली आहे. जर आपण आज जलपुनर्भरणाबाबतची आपली अनास्था सोडली नाही, तर पुढच्या पिढीला आपण वारसा म्हणून केवळ सोन्या-नाण्याची संपत्ती देऊ शकू, पण पिण्यासाठी शुद्ध पाण्याचा एक थेंबही देऊ शकणार नाही. -'पाणी जिरवा, जमीन जगवा... कारण जमीन जगली, तरच माणूस जगेल!'

### कायद्याचे कागदी घोडे आणि आपली उदासीनता

शासनाने नवीन इमारतींसाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' छतावरील पाणी जमिनीत जिरवणे) बंधनकारक केले आहे.

पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे? अनेक ठिकाणी केवळ इमारतीला परवानगी मिळवण्यापुरती ही यंत्रणा कागदावर किंवा नावापुरती उभारली जाते. ती चालू आहे की बंद, याकडे ना सोसायटीचे लक्ष असते ना प्रशासनाचे.

आपल्याकडे पाण्याचा कर भरला की 'आम्हाला पाणी मिळवणे हा आमचा हक्क आहे' असे मानले जाते. पण पाण्याचे संवर्धन करणे हे आपले 'कर्तव्य' आहे, ही भावना अजूनही आपल्यात रुजलेली नाही. पाणी ही विकत मिळणारी वस्तू नाही, तर तो निसर्गाचा मर्यादित ठेवा आहे, याचे भान आपण हरवून बसलो आहोत.

# सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टपूर्ती होते का ?



सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपण या दोन्ही संकल्पना पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आजच्या काळात वाढते शहरीकरण आणि जंगलतोड यांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांवर हा एक प्रभावी उपाय आहे.

खाली या दोन्ही संकल्पनांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. पारंपरिक जंगलांच्या पलीकडे जाऊन, जिथे लोक राहतात अशा सार्वजनिक, पडीक किंवा पिकांखाली नसलेल्या जमिनीवर स्थानिक लोकांच्या मदतीने झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे म्हणजे 'सामाजिक वनीकरण' होय.

**मुख्य उद्देशः** स्थानिक लोकांना जळाऊ लाकूड, चारा, लहान लाकूड आणि फळे उपलब्ध करून देणे, जेणेकरून मुख्य जंगलांवरील त्यांचा ताण कमी होईल.

सामाजिक वनीकरणाचे मुख्य प्रकार आहेत. ?शेत वनीकरण. शेतकरी आपल्या शेताच्या बांधावर किंवा पडीक जमिनीवर व्यावसायिक किंवा घरगुती उपयोगासाठी झाडे लावतात. ?सार्वजनिक वनीकरणात गावातील सामूहिक जमिनीवर (उदा. गायरान, पंचायतीची जमीन) संपूर्ण गावाच्या फायद्यासाठी सरकार आणि स्थानिक लोक एकत्र येऊन वृक्षारोपण करतात.

- रस्ता/रेल्वे कडेचे वनीकरण. रस्ते, रेल्वे लाईन, कालवे यांच्या दुतर्फा रिकाम्या जागेत झाडे लावणे. - वृक्षारोपण म्हणजे ठराविक उद्देशाने (पर्यावरण, सावली, फळे किंवा लाकूड) रोपे लावणे. ही एक वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर केली जाणारी कृती आहे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि आपल्याला ऑक्सिजन ($O_2$) देतात. यामुळे 'ग्लोबल वॉर्मिंग' नियंत्रित राहते.

- झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात, ज्यामुळे पावसाच्या पाण्याने जमिनीची धूप होत नाही.

- जलपातळीत वाढ: झाडांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते, परिणामी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते. पक्षी, कीटक आणि छोट्या प्राण्यांना हक्काचा निवारा मिळतो.

- सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपणासमोरील आव्हाने आहेत. जरी या योजना चांगल्या असल्या, तरी त्यांच्या यशस्वीतेमध्ये काही अडचणी येतात:

अनेकदा झाडे लावली जातात, पण त्यांचे पुढे संगोपन केले जात नाही. पाण्याची कमतरतेमुळे उन्हाळ्यात पाण्याच्या अभावामुळे लावलेली रोपे वाळून जातात. स्थानिक हवामानाला पूरक नसलेली झाडे लावल्यास (उदा. जास्त पाणी शोषून घेणारा निलगिरी) जमिनीचे नुकसान होऊ शकते.

- स्थानिक वृक्षांना प्राधान्य दिले जावे. वड, पिंपळ, कडुनिंब, चिंच, आंबा, जांभूळ यांसारखी स्थानिक झाडे लावावीत, कारण ती कमी पाण्यातही टिकतात.

- 'झाडे लावा, झाडे जगवा': फक्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम न करता, ती झाडे मोठी होईपर्यंत त्यांच्या संरक्षणाची (गुरेढोरे आणि पाण्याचा तुटवडा यांपासून) जबाबदारी घेतली पाहिजे.

- लोकसहभाग देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तरुणांना यात मोठ्या प्रमाणावर सामील करून घेणे गरजेचे आहे. ?थोडक्यात सांगायचे तर, सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपण ही केवळ सरकारी मोहीम नसून ती काळाची गरज आहे. आपण लावलेले एक झाड भविष्यातील पिढ्यांसाठी शुद्ध हवा आणि निरोगी जीवन देऊ शकते.



# भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर

भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, ६ जुलै १९१७ रोजी भारतातील वैज्ञानिक प्राच्यविज्ञानाचे अग्रगण्य प्रणेते रामकृष्ण गोपाल भांडारकर यांच्या नावाचे आणि कार्याचे स्मरण करण्यासाठी स्थापना करण्यात आली. याला महाराष्ट्र सरकारच्या वार्षिक नियोजित अनुदानाचा अंशतः पाठिंबा आहे. संस्थेला विशिष्ट संशोधन प्रकल्पांसाठी भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदानही मिळाले आहे.

प्राच्यविद्या म्हणजे पूर्वेकडील किंवा 'ओरिएंट' या प्राचीन देशी विद्या आणि ज्ञानाचा अभ्यास. पूर्वेकडील, विशेषतः भारतात निर्माण झालेल्या सर्वसमावेशक ज्ञानाविषयी जगाला प्रबोधन करण्याच्या दृष्टीकोनासह प्राच्यविद्या क्षेत्रातील संशोधन कार्याशी संबंधित संस्था स्वतःशी संबंधित आहे. संस्थेकडे १,२५,००० पुस्तके आणि २८,००० पेक्षा जास्त हस्तलिखिते पसरलेल्या दुर्मिळ पुस्तकांचा आणि हस्तलिखितांचा सर्वात मोठा संग्रह आहे ज्यात ९० वर्षांच्या कालावधीत ओरिएंटोलॉजीच्या प्रत्येक पैलूचा समावेश आहे. या संग्रहामध्ये संस्कृत, प्राकृत, भारतीय प्रादेशिक भाषा, शास्त्रीय, आसियान आणि युरोपियन भाषा यासारख्या अनेक भाषा आणि लिपी समाविष्ट आहेत. याशिवाय, महाभारत आणि प्राकृत भाषांमधील संशोधन प्रकल्पांच्या पाठपुराव्याद्वारे त्यांनी अमूल्य संदर्भ संग्रह तयार केले आहेत.

संस्था तिच्या विविध मेमोरियल लेक्चरशिप अंतर्गत अतिथी विद्वानांकडून शिकलेल्या व्याख्यानांचे आयोजन करते. ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, विविध चर्चासत्रे आणि अभ्यासपूर्ण चर्चाही संस्थेतर्फे आयोजित केल्या जातात. संस्था 'अ?नल्स ऑफ द भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट' हे वार्षिक नियतकालिक प्रकाशित करते. संस्थेची सर्वात प्रमुख प्रकाशने आहेत: महाभारताची गंभीर आवृत्ती, हस्तलिखितांचे वर्णनात्मक कॅटलॉग आणि प्राकृत शब्दकोश. भारताच्या सांस्कृतिक मंत्रालयाचा एक प्रकल्प, नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट्सच्या आश्रयाखाली एक हस्तलिखित संसाधन आणि संवर्धन केंद्र देखील संस्था आयोजित करते. थोडक्यात, गेल्या नऊ दशकांपासून ही संस्था भारतशास्त्रीय अभ्यास आणि संशोधनाच्या अत्यंत महत्त्वाच्या केंद्राची भूमिका प्रभावीपणे बजावत आहे.

पहिल्या पिढीतील अभ्यासक आणि थोर समाजसेवक सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या ऐंशीव्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या विद्यार्थ्यांनी आणि हितचिंतकांनी भांडारकर संस्थेची स्थापना केली. ६ जुलै १९१७ रोजी भांडारकर यांच्या सहस्त्रचंद्रदर्शनाचा योग साधून संस्था कार्यरत झाली. तत्कालीन मुंबई इलाख्याच्या ताब्यात असलेला हस्तलिखितांचा ठेवा १९१८ मध्ये संस्थेकडे देणगी म्हणून सोपविण्यात आला.

प्राच्यविद्येच्या क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील संशोधकांच्या ज्ञानाची भूक भागविणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचा सुवर्णकाळ आता इतिहासबद्ध होत आहे. 'भांडारकर'मध्येच ग्रंथपाल म्हणून अर्धशतकाहून अधिक काळ काम पाहिलेले वा.ल. मंजुळ हा इतिहास लिहीत आहेत. २०१७ मध्ये संस्थेच्या शताब्दी महोत्सवापूर्वी हा इतिहास जगासमोर आणण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

'भांडारकर'मध्ये झालेले संशोधनाचे कार्य, त्यामध्ये आपापला वाटा सक्षमपणे उचललेल्या व्यक्तींचे योगदान नव्या पिढीसमोर यावे, यासाठी हा इतिहास लिहिला जात आहे. संस्थेच्या स्थापनेसाठी 'आनंदाश्रमा'मध्ये झालेली बैठक, डॉ. रामकृष्ण भांडारकर, डॉ. नरहर सरदेसाई, डॉ. श्रीपाद बेलवलकर यांचे संस्थेच्या स्थापनेपासूनचे योगदान, संस्थेकडील हस्तलिखितांच्या संग्रहामध्ये होत असलेली प्रगती आणि त्याचे जतन करण्यासाठी होणारे प्रयत्न, संस्थेमध्ये कार्य करणाऱ्या सर्व ज्येष्ठ संशोधकांचे काम आणि त्यांच्याविषयीच्या आठवणींचा या इतिहासामध्ये समावेश होणार आहे.

### महाभारताची चिकित्सक आवृत्ती

संस्थेने १९१९ मध्ये महाभारताची चिकित्सक आवृत्ती प्रकाशित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. विष्णू सीताराम सुखठणकर यांची महाभारत प्रकल्पाच्या संपादकपदी नियुक्ती करण्यात आली. या प्रकल्पाला ब्रिटिश ॲकॅडमीने अर्थसाह्य केले होते. सुखटणकर यांच्या निधनानंतर श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांच्याकडे संपादकपदाची धुरा सोपविण्यात आली. १९४३ मध्ये संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमास स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रपती झालेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन उपस्थित होते. तर, १९६८ मध्ये झालेल्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमास राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन उपस्थित होते.

### महाभारत प्रकाशनमध्ये निजामाची देणगी

अतिथिगृहाची इमारत बांधण्यासाठी व महाभारत हे हिंदू महाकाव्य प्रकाशित करण्यासाठी पैशाची गरज होती. तेव्हा संस्थेने हैद्राबादचा सातवा निजाम मीर उस्मान अली खान याला विनंती केली. तेव्हा त्याने कोणताही वेळ न दवडता लगेच प्रतिवर्षी रु. १०००ची मदत ११ वर्षासाठी मंजूर केली. त्याबरोबरच अतिथिगृहासाठी रु. ५०,०००ची मदत जाहीर केली.

### प्राच्य विद्या परिषद

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद (ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्स) ही भांडारकर संस्थेने दिलेली देणगी आहे. संस्कृत आणि प्राच्यविद्या क्षेत्रातील अभ्यासक आणि संशोधकांचे संमेलन असे या परिषदेचे स्वरूप असून आतापर्यंत देशभरात विविध ठिकाणी ४७ परिषदा झाल्या आहेत.

# 20 व्या शतकातील असामान्य अलौकिक संत : गुलाबराव महाराज



आज जयंती

गुलाबराव महाराज यांचा जन्म ६ जुलै १८८१ मध्ये अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी टाकळी येथे झाला. ते महाराष्ट्रात होऊन गेलेले एक संत व मराठी लेखक होते. श्री. गुलाबराव महाराज हे विसाव्या शतकातील एक असामान्य अलौकिक संत होते. त्यांना वयाच्या आठव्या महिन्यात अंधत्व आले होते. त्यांचा जन्म तथाकथित निम्न जातीत झाला होता. सर्व आयुष्य ग्रामीण भागात गेले. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यानी एकूण १३४ ग्रंथ लिहिले. तेही फक्त ३४ वर्षांचे होते.

गुलाबराव महाराज यांनी बालपणीच ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला होता. 'भगवद्देह अनध्यस्त-विवर्त आहे, म्हणजे ज्ञानानंतर नाश पावत नाही' हा भक्तिसिद्धान्त शांकरतत्त्वज्ञानाच्या आधारावर मांडून त्यांनी मधुराद्वैत दर्शनाचा पुरस्कार केला. सांख्य-योगादी षड्दर्शने परस्परविरोधी नसून पूरक आहेत, असे त्यांनी वेळोवेळी सांगितले. 'भारतातील नानाविध धार्मिक संप्रदाय हिंदू, बौद्ध, जैनादी भारतीय धर्म आणि ख्रिस्ती, मुसलमानादी सर्व अभारतीय धर्म, वैदिक धर्माच्याच एकेका अंशावर स्थित आहेत' असे विचार ते मांडत असत. डार्विनचा उत्क्रांतिवाद, स्पेन्सरचे तत्त्वज्ञान इ. पाश्चात्य विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या संतांच्या ग्रंथांचे सार एकत्रित करून गुलाबराव महाराजांनी आपल्या अवघ्या ३४ वर्षांच्या आयुष्यात ग्रंथनिर्मिती केली.

आर्य हा वंश असून तो बाहेरून भारतात आला, हे मॅक्समुल्लरचे व लोकमान्य टिळकांचे मत गुलाबराव महाराजांना मान्य नव्हते. प्राचीन ग्रंथांतील गणित, रेडियम, ध्वनी, ईथर, इलेक्ट्रॉन्स, उष्णता-गति-प्रकाश, विमानविद्या, अणुविज्ञान वगैरेंचे अनेक मौलिक संदर्भ त्यांनी दाखविले. वेदान्त, उपनिषदे, आत्मज्ञान, प्राचीन संत साहित्य, ध्यान-योग-मधुराभक्ती, आयुर्वेद, डार्विन-स्पेन्सर आदी शास्त्रज्ञांचे सिद्धान्त - हे त्यांच्या अभ्यासाचे, चिंतनाचे व लेखनाचे विषय होत. 'मधुराद्वैत' (मधुरा भक्ती व अद्वैत विचार यांचा समन्वय) हा नवा विचार त्यांनी भक्तांना दिला.

गुलाबराव स्वतःला संत ज्ञानेश्वरांची कन्या मानत असत. कृष्णपत्नी मानून मंगळसूत्रादी स्त्रीचिन्हेही ते धारण करीत. महाराजांच्या नंतर त्यांचा संप्रदाय बाबाजी महाराज पंडित यांनी इ.स. १९६४ पर्यंत चालविला. गुलाबराव महाराज यांचे २० सप्टेंबर १९१५ मध्ये पुणे येथे वयाच्या ३४ व्या वर्षी निधन झाले.

### जन्मांध असूनही १३३ ग्रंथांचे लिखान

गुलाबराव महाराज यांना त्यांना वयाच्या आठव्या महिन्यात अंधत्व आले होते. असे असूनही मराठी, हिंदी व संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराज यांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगीत इत्यादी अनेक विषयांवर लेखन केले. संस्कृत, हिंदी, मराठी या भाषांतून व वऱ्हाडी बोलीतून त्यांनी १३३ ग्रंथ लिहिले. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, निबंध, प्रश्नोत्तरे, पत्रे, आत्मचरित्र, आख्याने, नाटक, लोकगीते, स्तोत्रे, व्याकरण, कोश वगैरे वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले. २७,००० ओव्या, २,५०० अभंग, २,५०० पदे, ३,००० श्लोकादी रचना आदींचा त्यांत समावेश आहे.

### प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांच्या ज्ञानाचा परिचय

मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज एकदा ख्यातनाम मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीत गेले. ग्रंथालयात विशिष्ट विषयांवरील कुठले ग्रंथ आहेत, या जिज्ञासेपायी त्यांनी ग्रंथपालांना विचारणा केली. ग्रंथपाल महाराजांना ओळखत नव्हता. एक अंध व्यक्ती ग्रंथांची विचारपूस करते म्हणून त्या सर्वच लोकांना कुतूहल वाटले. ग्रंथपालाच्या सहकाऱ्याने महाराजांना ग्रंथांची नावे सांगणे सुरू केले. बहुतांश ग्रंथ महाराजांना माहित होते. या ग्रंथांचा क्रम कसा लावावयास हवा, हे महाराज त्या-त्या ग्रंथातील सारांशाच्या आधारे त्या ग्रंथालयकर्मीला सांगत होते. ग्रंथपाल व आजूबाजूचे लोक महाराजांचे ज्ञान पाहून थक्क झाले. चौकशीअंती त्यांना समजले की अत्यंत सामान्य दिसणारी ही अंध व्यक्ती म्हणजे मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज आहेत.

### अलौकिक प्रतिभेचे धनी

गुलाबराव महाराजांचा जीवनपट विलक्षण आहे. अमरावती जिल्ह्यात नांदगाव (खंडे)ता. लोणीला महाराजांचा जन्म झाला. मातृवियोगानंतर सहा वर्षे बडनेराजवळ असलेल्या लोणी टाकळी येथे गुलाबराव महाराजांचे वास्तव्य होते. घरातील वातावरण पूर्णपणे प्रतिकूल. आठव्या महिन्यातच आजाराने डोळे गेले म्हणून आंधळेपणा आलेला. अशा स्थितीत महाराजांनी सर्व ज्ञान कसे प्राप्त केले.

हा प्रश्न सामान्य माणसाला निश्चित पडतो. इंग्रजीतील आधुनिक विज्ञानावरचे, धर्म आणि अध्यात्म शास्त्र, संस्कृतातील गायनशास्त्रावरचे, वैद्यक शास्त्रावरचे, विविध कला विषयांचे, वेद-उपनिषदांसह सर्व ग्रंथांचे वाचन त्यांनी वयाच्या १२ ते १६ वर्षांच्या काळातच करून घेतले. प्रपंच किंवा परमार्थ असा एकही विषय राहिला नाही की ज्यावर गुलाबराव महाराजांनी आपले स्वतंत्र विचार प्रगट केले नाहीत. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर उत्तरेकडचे व बंगालकडचेही जे मोठे विद्वान त्यांच्या संपर्कात आले ते सर्व त्यांची अलौकिक प्रतिभा पाहून थक्क झाले. त्यांच्या शुद्ध आचरणाला व अगाध ज्ञानाला भुलून लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. मानभाव मत, डार्विन मत, स्पेन्सर, मायर्स यांच्या मतांवर आणि ग्रंथांवर महाराजांनी समीक्षा केली. जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा केली. विविध विषयांवरच्या १३४ ग्रंथांचे लेखन महाराजांनी केले. मराठी, हिंदी, ब्रज, संस्कृत भाषेत लेखन केले. काव्य, योग, संगीत, धर्म, सांख्यशास्त्र, वेदान्त, छंदशास्त्र असे सर्व विषय हाताळले. हे अगाध ज्ञान महाराजांनी केव्हा व कसे प्राप्त केले असेल हा विषय आजही आपल्या विचारक्षमतेच्या बाहेरचाच आहे.

### अचाट स्मरणशक्तीची लाभली होती देणगी

महाराज जवळच्या लोकांकडून पुस्तके वाचून घेत असत. अगाध स्मरणशक्तीच्या आधारे एकदा ऐकताच त्यांच्या स्मरणात राहत असे. त्यांच्यासाठी पुस्तक वाचणारा कधीच रिकाम्या हाताने परत गेला नाही. प्रत्येकाला दक्षिणा द्यायचे. ज्वारी, गहू, हातातील चांदीचे कडे, घरातील मौल्यवान वस्तू. ग्रंथ वाचून दाखविणाऱ्याला गुरुदक्षिणा म्हणून त्यांनी काय काय वस्तू दिल्या असतील ते त्यांना किंवा घेणाऱ्यालाच माहिती. महाराजांनी आपल्या आयुष्यात कशाचा मोह बाळगला असेल तर तो केवळ ज्ञानलालसेचा, अर्थातच ग्रंथांचा आणि पुस्तकांचा! पत्नीचे एक लुगडे व स्वतःच्या अंगावर बंडी आणि धोतर या शिवाय महाराजांजवळ कुठलीच संपत्ती नव्हती. जवळच्या मंडळींकडे त्यांनी कशाचा आग्रह धरला असेल तर तो म्हणजे फक्त पुस्तकांचा. गुलाबराव महाराजांनी दोन हजारहून अधिक ग्रंथ जवळ बाळगले. पुस्तकांच्या पेट्या डोक्यावर घेऊन कितीही मैलांचा प्रवास ते पती-पत्नी करीत.. ती दुर्मिळ अशी ग्रंथसंपदा आजही अमरावतीत सुरक्षित आहे. या ग्रंथसंपदेवर महाराजांचा जीव होता. 'ज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका' ग्रंथाचे कर्ते वेदान्तकेसरी बाबाजी महाराज पंडित या आपल्या शिष्योत्तमावर महाराजांचे प्रचंड प्रेम होते. बाबाजी महाराजांची गुरुभक्ती निःसीम होती. स्वतः गुलाबराव महाराजांनीच 'मी पंडिताला वश झालो आहे', असे उद्गार काढले होते. त्या बाबाजी महाराज पंडितांना गुलाबराव महाराजांनी आपल्या शेवटच्या काळात काही मोलाच्या सूचना केल्या होत्या. त्यात ग्रंथालयाची व्यवस्था चांगली ठेवावी, ही पण एक सूचना होती. बाबाजी महाराज पंडितांनी महाराजांच्या अन्य सूचनांप्रमाणेच याही सूचनेचे अत्यंत तंतोतंत पालन केले. परिणामी महाराजांचा हा धनसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटाच्या आत दहिसाथीत असलेल्या ज्ञानेश्वर महाराज मंदिरात सुस्थितीत, सुरक्षितपणे जपून ठेवला आहे.

### महाराजांनी अकोल्याच्या चित्रकाराकडून ज्ञानेश्वर माउलींचे काढले होते चित्र

अंध असलेल्या गुलाबराव महाराजांनी अकोल्याच्या एका चित्रकाराकरवी ज्ञानेश्वर माउलींचे एक चित्र तयार करून घेतले होते. याच चित्राच्या आधारे नंतर ज्ञानेश्वर माउलींचा फेट्यातील समाधिस्थ बसलेले चित्र विविध चित्रकारांनी साकारले. ते चित्र आजही या ज्ञानेश्वर मंदिरात अग्रभागी लावण्यात आले आहे. गुलाबराव महाराजांच्या ग्रंथ संपदेत आज अत्यंत दुर्मिळ असलेल्या ग्रंथांचाही समावेश आहे. या ग्रंथसंपदेची संख्या दोन हजाराहून अधिक आहे.

# दलित, भूमिहीन कुटुंबांच्या हक्काच्या जागेवर केंद्रीय विद्यालय

सिटी न्यूज सुपरफास्ट च्या बातमीनंतर....

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** अकोला तालुक्यातील मौजे गुडधी येथील दलित, मागासवर्गीय आणि भूमिहीन नागरिकांच्या हक्काच्या जागेवर त्यांच्या संमतीशिवाय 'केंद्रीय विद्यालय' उभारण्याचा घाट प्रशासनाकडून घातला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या चुकीच्या निर्णयामुळे १३६ गरीब कुटुंबांच्या निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने हा करार रद्द न केल्यास तीव्र कायदेशीर आंदोलन छेडण्याचा इशारा गुडधी येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.आज मोठ्या संख्येत स्थानिकांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. गुडधी येथील नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, हे सर्व कुटुंब मागील ५० वर्षांपेक्षा अधिक काळापासून या भागात अत्यंत हलाखीच्या आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीत मोलमजुरी करून जीवन जगत आहेत. या भूमिहीन कुटुंबांना सन्मानाने जगता यावे व हक्काचे घर मिळावे म्हणून शासनाने मौजे गुडधी येथील गट क्रमांक व उपविभाग १३३/अ/ब/क मधील ७३.५०७ हेक्टर आर जमीन अधिग्रहीत केली होती. या जागेवर १३६ कुटुंबांना सरकारी गावठाण प्लॉटचे पट्टे वाटप करण्यात आले होते. यासाठी नागरिकांनी शासकीय चलनाची रक्कमेचा भरणा देखील केला होता, ज्याच्या पावत्या आणि ताबा पत्र आजही या नागरिकांकडे सुरक्षित आहेत.या निवेदनावर महादेव अमृता चोरपगार, गणेश शिरसार, भारत डोंगरे, सचिन कीर्तक, नागसेन गजभिये, सुरेखा शिरसाठ, शोभा डोके यांच्यासह गुडधी येथील शेकडो त्रस्त महिला व पुरुषांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या संवेदनशील मुद्द्यावर जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### तर अनुचित घटनेला प्रशासन जबाबदार राहणार !

» आम्हाला मिळालेले प्लॉट आम्ही कधीही शासनाकडे जमा केलेले नाहीत. त्यामुळे आमचा कायदेशीर हक्क डावलून ही जागा केंद्रीय विद्यालयाला देणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे,' असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. पूर्वी या विद्यालयासाठी आगरकर विद्यालय, अकोला येथील जागा निश्चित झाली होती, तिथेच ते विद्यालय हलवावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.'प्रशासनाच्या या चुकीच्या निर्णयामुळे १३६ गरीब कुटुंबांवर मोठे संकट कोसळले आहे. जर आमच्या संमतीशिवाय ही जागा घेतली गेली, तर आम्ही कायदेशीर आंदोलन उभे करू. यादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी आणि प्रशासनाची राहील.'

— गुडधी ग्रामस्थ (अकोला)

### आता जागाच हिरावण्याचा प्रयत्न !

» नागरिकांचा आरोप आहे की, पट्टे वाटप करून ताबा दिल्यानंतर आजतागायत प्रशासनाने या भागात रस्ते, पथदिवे, वीज पुरवठा किंवा पाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. वारंवार मागणी करूनही लेआउट अंतिम करण्यात आले नाही. एकीकडे हक्काच्या जागेवर घरे बांधण्यासाठी सुविधा दिल्या जात नसताना, दुसरीकडे नागरिकांकडून कोणताही ताबा परत न घेता, गैरमार्गाने ही जागा केंद्रीय विद्यालयाला देण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरू आहेत.


घरकुलाची जागा केंद्रीय विद्यालयास
गट क्रमांक १३३ मधील जागा तर घरकुलासाठी, गुडधी येथे केंद्रिय विद्यालय होणार की नाही

# राजापेठ पोलीसांनी गहाळ झालेले 25 लाख रूपयांचे सोने फिर्यादीला दिले परत

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी गहाळ झालेले 25,00,000/- रूपये चे सोने फिर्यादील परत देण्यात आले. फिर्यादी गजानन अंबर वर्धे, वय 52 वर्षे, रा. साईनगर, अमरावती हयांनी पोलीस स्टेशनला दिनांक 1 जुले रोजी येवुन तकार दिली की, त्यांची पत्नी संगीता वर्धे हिला पोटा संबंधी विकार असल्याने त्यांचा उपचार ए.आय.जी. हॉस्पीटल, हैद्राबाद येथे चालु होता. फिर्यादीचे पत्नीची प्रकृत्ती अचाणकपणे खराब झाल्याने फिर्यादी, सोबत त्याची पत्नी व मुलगी असे चारचाकी वाहनाने हैद्राबाद येथे दिनांक 29.06.2026 ला रवाना झाले. फिर्यादीने जाते वेळी पत्नीच्या उपचारासाठी जास्त खर्च येणार असल्याने त्यांनी त्यांचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम 25,00,000 लाख रूपयांचे असे एका लाल रंगाचे कॉलेज बॅगमध्ये भरून गाडीमध्ये घेवुन गेले. दिनांक 30.06.2026 रोजी ए.आय.जी. हॉस्पीटल, हैद्राबाद येथे फिर्यादीचे पत्नीचा उपचार चालु असतांना तेथील डॉक्टरांनी फिर्यादीला त्यांचे पत्नीची प्रकृती अत्यंत खालावलेली आहे. तुम्ही तिला घेवुन जा. असे सांगीतल्याने फिर्यादी हैद्राबाद येथुन त्यांचे पत्नीला अॅम्बुलन्समध्ये बसुन अमरावतीला परत येण्यास निघाले. फिर्यादीचे पत्नीचे रस्त्यामध्ये पल्स कमी झाल्याने दिनांक 30.06.26 रोजी अदीलाबाद येथील शासकीय रुग्णालयामध्ये नेले असता तेथील डॉक्टरांनी फिर्यादीची पत्नी मयत झाली असल्याचे सांगीतले. तेथून फिर्यादी दिनांक 30.06.26 रोजी अमरावतीला येवून फिर्यादीन त्यांचे पत्नीचा अंतवीधी केला. अंतविधी झाल्यानंतर फिर्यादीने गाडीमध्ये ठेवलेली लाल रंगाची बॅग चेक केली असता ति दिसुन आली नाही. वरून फिर्यादीचे लक्षात आले की, त्यांचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम वजनाचे 25,00,000 लाख रूपयांचे हे चोरी गेली आहे. असी तकार पोलीस स्टेशन राजापेठ येथे प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस आयुक्त यांना घटनेची माहीती देवुन त्यांचे आदेशाने तत्काळ डि. बी पथकाला पुढील सुचना देवुन फिर्यादी व डिबी पथकातील पोकॉ अंकुश काळे, पोकॉ नरेश बावने, यांना फिर्यादी सोबत हैद्राबाद येथे रवाणा केले. पथकातील पोलीसांनी हैद्राबाद येथील एआयजी हॉस्पीटल, अदीलाबाद येथील शासकीय हॉस्पीटल, तसेच अदीलाबाद समोरील जनता रेस्टॉरन्ट येथील 30 ते 40 सिसीटीव्ही कॅमेरे चेक करून दिवस रात्र अथक परीश्रम केले. हैद्राबाद ते अदीलाबाद रोडवरील जनता रेस्टॉरन्ट येथुन फिर्यादीची लाल रंगाची बॅग ज्यामध्ये फिर्यादीचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम वजनाचे 25,00,000 लाख रूपयांचे तसेच उपचाराचे कागदपत्र मिळुन आले. सदरचे फिर्यादीचे 25,00,000 रूपयांचे सोने व बॅगमधील महत्वाचे कागदपत्र फिर्यादीला परत देण्यात आले आहे. सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त,श्याम घुगे पोलीस उपायुक्त परि 2 अमरावती संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शन खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सपोनी नितीन शिंदे पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेकॉ रवी लीखीतकर, पोहेकॉ शर्श शेळके, पोकों अंकुश काळे, पोकॉ नरेश बावने, पोकॉ प्रवीण बेलोकार पोका अर्जुन कदम, पोकों अमोल खंडेजोड, पोकों आकाश यादव पोकों यश ओगले, यांनी केली.



# अकोल्यात युवकावर प्राणघातक हल्ला!

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** अकोला शहरात रविवारी रात्री घडलेल्या एका खळबळजनक घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील गजबजलेल्या परिसरात असलेल्या अनिल कोल्ड ड्रिंक्ससमोर एका युवकावर अज्ञात हल्लेखोरांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात सादिक खान रा. जेतवन नगर, खदान हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रविवारी रात्री सादिक खान हे अनिल कोल्ड ड्रिंक्स परिसरात असताना काही व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्र अथवा इतर घातक साधनांचा वापर केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, या हल्ल्यात सादिक खान गंभीररीत्या जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. या घटनेचे सर्वाधिक धक्कादायक वैशिष्ट्य म्हणजे हा प्राणघातक हल्ला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर घडला आहे. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात आणि पोलीस प्रशासनाच्या प्रमुख कार्यालयाच्या जवळच अशा प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, जुना वाद, वैयक्तिक वैमनस्य किंवा इतर कोणत्या कारणातून हा हल्ला झाला, याचा तपास पोलीस करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# एक्सपायरी झालेला माल ग्राहकांच्या मस्तकी मारला जातो?

## स्थानिक एफडीए यंत्रणा झोपली का

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला:** अकोला शहरातील नागरिकांच्या आरोग्याची हेळसांड करणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही व्यापारी एक्सपायरी झालेला पॅकिंग किराणा व खाद्यपदार्थ स्वस्त दरात लूज करून विकत आहेत. स्थानिक अन्न औषधी प्रशासनाच्या अधिका-यांनी या गंभीर प्रकाराची शहनिशा करून संबंधितांवर कारवाई करावी. कारण नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला खेळ नाही तर जीवनावश्यक अधिनियमाची पायमल्ली आहे. त्यामुळे कथीत प्रकार थांबणे गरजेचे आहे.

किराणा माल पॅकिंग मध्ये विकला जात आहे. इतकेच नाही तर खाद्य तेल देखील सुटे न विकता पॅकिंग मध्ये विकण्याचे आदेश देण्यात आले होते. असे असताना एक्सपायरी झालेला माल सुटा करून विकला जात असेल तर तो गुन्हा आहे. बाजारात असा माल येता कामा नये. नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला असा खेळ तातडीने थांबवावा लागेल. अन्न औषधी प्रशासनाने याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.




# मारहाण करून घराला लावली आग

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** खदान पोलीस स्टेशन हद्दीतील मलकापूर येथील राजरत्न कॉलनी परिसरात घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, एका कुटुंबाला जातीवाचक शिवीगाळ, मारहाण आणि घरातील साहित्य जाळून नुकसान केल्याप्रकरणी पोलिसांनी गंभीर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह भारतीय दंड संहितेतील विविध गंभीर कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील मलकापूर येथील राजरत्न कॉलनी परिसरात ३ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादीने दिलेल्या जबाबानुसार, आरोपींनी त्यांच्या पतीला अडवून त्यांची कॉलर पकडली व जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी आरोपींनी फिर्यादीच्या पतीच्या छातीवर आणि पोटावर बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आपल्या पतीला वाचविण्यासाठी फिर्यादी पुढे आल्या असता आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच जातीवाचक शब्दांचा वापर करून अपमानित केल्याचाही गंभीर आरोप फिर्यादीने आपल्या तक्रारीत केला आहे.

आरोपींनी सव्वालाखांचे नुकसान या आगीत घरातील विविध वस्तू जळून खाक झाल्या असून, सुमारे १ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीने खदान पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. घरातील जीवनावश्यक वस्तूंवर ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी इंदोरीकर, गौरव इंदोरीकर आणि गौरव जानूनकर यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४३६, ४२७, ३२३, ५०४, ५०६, ३४ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१) (२), ३(१) (स), ३(२) (व्हीए) आदी कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, उपविभागीय अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक केदारे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक लहाने यांच्याकडून करण्यात येत आहे.

# जीर्ण झालेली शाळेची स्वच्छतागृहाची भिंत कोसळली



**मूर्तिजापूर :** स्थानिक जुनी वस्तीतील हलवाई पुरी येथील नॅशनल उर्दू हायस्कूलमध्ये शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहाची भिंत अचानक कोसळल्याची घटना घडली.

सकाळच्या सत्रातील सुट्टी होताच ही भिंत थेट रस्त्यावर कोसळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने घटना टळली. यावेळी रस्त्यावरून ये-जा करणारे पादचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी कोणालाही दुखापत झाली नसल्याने पालक व नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. घटनेनंतर संस्थेच्या अध्यक्षांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सोमवार व मंगळवार या दोन दिवसांची सुट्टी जाहीर केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून सर्व सोयी-सुविधांनी युक्त दुमजली नव्या वास्तूमध्ये शाळेचे स्थलांतर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षांनी दिली. या घटनेमुळे जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून शैक्षणिक संस्थांच्या इमारतींची वेळोवेळी तपासणी होण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### काळे ढग आणि अस्वस्थ रस्ते....



शेतीसाठी पाऊस पाहिजे. रोजच्या जगण्यासाठी पाऊस आणि पाणी पाहिजे. पण, या डाबकी रोडवर मात्र रहिवाशांना पाऊस नकोसा असतो. भरून आलेलं आभाळ 'थोड्याच वेळात सगळं चिंब होणार... पाऊस पडण्याआधीची ही शांतता आणि धावपळ वेगळीच असते.' 'काळ्या ढगांच्या सावलीत, रोजची धावपळ... पावसाची चाहूल मात्र लागलीये. **(छाया - राम तिवारी)**

# सगणापूरमध्ये घराला भीषण आग

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील सगणापूर येथे रविवारी (दि. ५) दुपारी एका घराला भीषण आग लागून गरीब कुटुंबाचा संसार अक्षरशः राख झाला. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, या दुर्घटनेत सुमारे तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयाजवळ राहणारे दिनकर अर्जुन मोहितकार यांच्या घरात दुपारी सुमारे एक वाजताच्या सुमारास ही घटना घडली. अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने घरातील फ्रिज, दूरदर्शन संच, पंखे, कपडे, घरगुती साहित्य तसेच इतर संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य नष्ट झाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. घटनेची माहिती मिळताच तलाठी, पोलीस, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. त्यामुळे आग शेजारील घरांपर्यंत पोहोचण्याचा धोका टळून मोठी दुर्घटना टळली.

दिनकर मोहितकार यांच्याकडे स्वतःची शेती नसून ते ठेक्याने शेती आणि रोजंदारी मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. या आगीत त्यांचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबासमोर उपजीविकेचे मोठे संकट उभे ठाकले आहे. महसूल विभागाकडून पंचनामा करण्यात येत असून, अधिकृत अहवालानंतर नुकसानीची नेमकी रक्कम स्पष्ट होणार आहे. दरम्यान बाधित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत जीवनावश्यक साहित्य आणि शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



### पर्यायी मथळे :

» सगणापूरमध्ये आगीचे तांडव; मजुराचा संसार क्षणात राख

» शॉर्टसर्किटचा फटका; दिनकर मोहितकार कुटुंबावर संकटाचा डोंगर ग्रामस्थांच्या सतर्कतेने मोठी दुर्घटना टळली; घरातील सर्व साहित्य जळाले सगणापूरमध्ये भीषण आग;

» तीन लाखांहून अधिक नुकसान रोजंदारी करणाऱ्या कुटुंबाचा संसार भस्म; मदतीची ग्रामस्थांची मागणी

# पेरणीसाठी गेलेल्या महिलेला जातीवाचक शिवीगाळ

प्रतिनिधी ६ जुलै

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला 1 जुलै रोजी दुपारी सुमारे 12 वाजेच्या सुमारास देवरण रोडलगत असलेल्या गट क्रमांक 97 मधील शेतात पेरणीच्या कामासाठी गेली होती. त्यावेळी आरोपींनी शेतात येण्याच्या कारणावरून वाद घालत कथितरित्या अश्लील व जातीवाचक शब्दांचा वापर करून शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तिघांवर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारहाण करून ब्लाऊज फाडल्याचा आरोप आहे. तसेच इतर आरोपींनी फिर्यादीच्या पती व मुलालाही लाथाबुक्क्या आणि थापडा मारून मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याशिवाय जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस सिटी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजू वानखडे व हेपोकॉ लोणकर करीत आहेत.

# शाळांमध्ये एकाच बुकस्टॉलवरून पुस्तके घेण्याची सक्ती थांबवा

प्रतिनिधी ६ जुलै

**मूर्तिजापूर :** शाळांमध्ये एकाच बुक स्टॉल वर पुस्तके घेण्याची सक्ती करू नये अशी मागणी साईराज मित्र मंडळ कडून निवेदनात करण्यात आली. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला. यावेळी साईराज मित्र मंडळाचे अध्यक्ष रवी चौहान, उपाध्यक्ष दिनेश श्रीवास यांच्यासह सुनील भोजगडिया, विलास वानखेडे, विलास नसले, विष्णू लोडम, शाम काकडे, संतोष इंगोले, मोहम्मद इम्रान, रमेश दर्याणी, दिगंबर सदार आणि मनोज अहेरवार उपस्थित होते.

एका बुक स्टॉलशी संगनमत करून साहित्य खरेदीची सक्ती करणाऱ्या शाळांविरोधात तातडीने कारवाई करावी,अन्यथा संबंधित शाळा व बुकस्टॉल विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा साईराज मित्र मंडळाने दिला आहे. शहरातील इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी एका विशिष्ट बुकस्टॉलची सक्ती केली जात असल्याचा आरोप साईराज मित्र मंडळाने केला आहे. यासंदर्भात मंडळाने पंचायत समितीतील गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रत्येक शाळेच्या सूचना फलकावर किमान पाच बुकस्टॉलची नावे प्रदर्शित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे पालकांना आपल्या पसंतीच्या दुकानातून शैक्षणिक साहित्य खरेदी करता येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले.




# 'कोसळ' धारांचे 12 बळी; सलग दुसऱ्या दिवशी मुंबई परिसराला पावसाने झोडपले

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई:** पावसात झाडे कोसळण्याच्या घटनांचे सत्र सुरूच असून कुर्ला आणि गोरेगाव येथे दोघांचा झाडांच्या फांद्या कोसळून मृत्यू झाला. तर नवी मुंबई आणि पनवेल येथे अतिवृष्टीशी संबंधित घटनांमध्ये चार जण ठार झाले.

मुंबई आणि परिसराला रविवारी, सलग दुसऱ्या दिवशी, मुसळधार पावसाने झोडपून काढले. मानखुर्द येथे एका चाळीतील तीन मजली घर कोसळून सहा जणांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाला.

मुंबई आणि उपनगरांत सकाळच्या सत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली. मानखुर्द येथील जनता नगरमध्ये चाळ क्रमांक पाच येथे रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास तीन मजली घर अचानक कोसळले. यामध्ये एकाच कुटुंबातील काही जण अडकले. स्थानिकांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले. तर अग्निशमन दल आणि पोलिसांना पाचारण करण्यात आले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यासाठी त्वरित शोधमोहीम सुरू केली. मुसळधार पावसामुळे शोधकार्यात अडचणी येत होत्या. रात्री ११च्या सुमारास सात जणांना बाहेर काढले. यातील पाच जणांना शताब्दी तर दोन जणांना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, शताब्दी रुग्णालयातील पाच जणांचा मृत्यू झाला. यामध्ये चार महिला आणि एक पुरुषाचा समावेश आहे. राजावाडी रुग्णालयात दाखल एका पुरुषाचा मृत्यू झाला. एक जण जखमी असून त्याच्यावर उपचार सूरू आहेत. यामध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. ही घटना घडली ती जागा जिल्हाधिकारी जागा असून त्याला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नोटीसही बजावण्यात आल्याचे समजते. मात्र, त्यानंतरही ही जागा रिकामी करण्यात आली नव्हती. कोसळलेल्या घराच्या तळमजल्यावर गोडाऊनही होते.



कुर्ला कमानी येथे दुपारी साडेबाराच्या सुमारास गोम्स टाऊन इमारतीजवळ असलेल्या दुकानावर झाडाची मोठी फांदी कोसळली. या दुर्घटनेत युनुस कुंडावाला (६३) हे जबर जखमी झाले. रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्यांचा मृत्यू झाला. वांद्रे येथील मोतीलाल जवाहर नगर येथे राहणारे कुंडावाला यांनी कुर्ल्यात नवीन दुकान घेतले होते. या दुकानाच्या उद्घाटनच्या तयारीसाठी ते आले होते. अन्य एका घटनेत कुमार हसन रझा जहांगीर आलम सय्यद (१८) हा अंधेरी पूर्व येथे राहणारा तरुण दुपारी साडेतीनच्या सुमारास मित्रांसोबत आरे वसाहतीत फिरण्यासाठी दुचाकीवरून आला होता. युनिट क्रमांक १३ येथील रस्त्यावरून जात असता झाडाची एक फांदी त्याच्या डोक्यावर पडली. रुग्णालयात त्याला मृत घोषित केले. मुंबईच्या मानखुर्दमध्ये हाहाकार, ६ जणांचा मृत्यू, तीन मजली बांधकाम कोसळल्याची घटना. पाच लाखांची मदत जाहीर. कुर्ल्यातील घटनेनंतर महापालिकेचा एकही अधिकारी न फिरकल्याने मनसेच्या कार्यकत्यांनी तेथे आंदोलन केले. घटनेची माहिती मिळताच महापौर रितू तावडे यांनी घटनास्थळाला भेट दिली. कुंडावाला यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत तावडे यांनी जाहीर केली.

घणसोली येथे विजेचा धक्का लागून बुद्धीराम प्रधान या २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. वाशी सेक्टर-११ येथील जुहूगाव परिसरात असलेल्या 'अपना ढाबा' परिसरातील रस्त्यालगतच्या एका जुन्या इमारतीचा भाग रविवारी अचानक कोसळला. या दुर्घटनेत रस्त्यावरून जात असलेल्या सुमारे ३५ वर्षीय पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. तर एक महिला जखमी झाली आहे. अतिवृष्टीशी संबंधित घटनांमध्ये पनवेल तालुक्यात दोन जणांचा मृत्यू झाला असून एक मुलगा बेपत्ता आहे.

मुंबईत आज, सोमवारी मुसळधार पाऊस आणि सोसायट्याचे वारे वाहतील, असा इशारा हवामान विभागाने दिल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई, ठाणे जिल्ह्यातील सर्व शासकीय, खासगी, महानगरपालिका शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

तसेच रायगड, रत्नागिरी येथील शाळांनाही आज, सोमवारी सुट्टी जाहीर करण्यात आली. तर, पालघरमध्ये सुट्टीबाबतचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक प्रशासनावर सोपवला. मुंबईत रविवारी सकाळी कोसळलेल्या मुसळधार पावसाचा आणि ताशी ४२ नॉट्स वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांचा फटका विमानसेवेलाही बसला. सुरक्षिततेच्या कारणास्तव मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टीवरील उड्डाणे आणि अवतरणाची प्रक्रिया सुमारे तासभर थांबविण्यात आली. यामुळे इंडिगोची चार उड्डाणे रद्द करण्यात आली. ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, भिवंडीसह जिल्ह्यातील अन्य शहरात रविवारी पावसाची संततधार कायम होती. सोसाट्याच्या वाऱ्यासह कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे ठिकठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. ठाणे शहरात इमारतीच्या गॅलरीचा काही भाग तर दिव्यात इमारतीच्या जिन्याचा स्लॅब पडला. नवी मुंबईत रविवारी सकाळपासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अनेक भागातील रस्त्यांवर पाणी साचले.

**गोवा महामार्गावर कोंडी**

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाकण ते नागोठणे दरम्यान वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. वाहनांना व प्रवाशांना तासनतास महामार्गावरच अडकून राहावे लागले. जिल्ह्यात गेल्या २४ तासांत सरासरी २११.९० मिमी पावसाची नोंद झाली.

**धरणांमध्ये 'पाणी' बेगमी**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात धरणक्षेत्रांमध्ये वर्षभराच्या पाण्याची बेगमी होऊ लागली आहे. त्यामुळे शनिवारी सातही धरणातील असलेला ९.४१ टक्के पाणीसाठा रविवारी थेट १३ टक्क्यांवर पोहोचला. अप्पर वैतरणा धरणात शून्य टक्के असलेला पाणीसाठा रविवारी थेट चार टक्क्यांपर्यंत वाढला. विहार, तुळशी धरणक्षेत्रातही पाऊस चांगला बरसला असून मुंबईकरांसाठी ही दिलासादायक बातमी आहे

## मुंबईतील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** भारतीय हवामान विभागाने (आईएमडी) मुंबईसाठी सोमवार, ६ जुलै रोजी ऑरेंज अलर्ट जारी करत मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याचा इशारा दिल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील सर्व शासकीय, खासगी, महानगरपालिका शाळा आणि महाविद्यालयांना सोमवार, ६ जुलै रोजी सुट्टी जाहीर केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. मात्र, शासकीय आणि खासगी कार्यालये नेहमीप्रमाणे सुरू राहणार असून कर्मचाऱ्यांनी नियमितपणे कामावर हजर राहावे, असेही प्रशासनाने सांगितले आहे. महापालिकेने नागरिकांना अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, हवामान विभाग आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे तसेच कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास संबंधित यंत्रणांशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## मुंबईत ताशी 80 ते 90 किमी वेगाने वारे वाहणार

♦ रेड अलर्ट जारी, गरज असेल तरच घराबाहेर पडा

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला असून, ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे, सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. गेल्या चार दिवसापासून मुंबईसह राज्याला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. काल रात्रीपासून तर पावसाने मुंबईची दाणादाण उडवून दिली आहे. त्यामुळे आजची सकाळ मुंबईकरांसाठी अत्यंत त्रासदायक ठरली आहे. अतिवृष्टीचा अलर्ट असल्याने मुंबईच्या शाळा, महाविद्यालयांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. आता परत एकदा मुंबई महापालिकेने धडकी भरवणारा अलर्ट जारी केला आहे. मुंबईत आज ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने प्रचंड वारे वाहणार आहे. त्यामुळे मुंबईकरांनी विनाकारण घराबाहेर पडू नये, असं महापालिकेने म्हटलं आहे. भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगर क्षेत्रासाठी अतिवृष्टीचा इशारा जारी केला असून ताशी ८० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तविली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे. झाडे, जीर्ण इमारती, होर्डिंग्ज, विद्युत खांब तसेच इतर धोकादायक ठिकाणांपासून सुरक्षित अंतर राखावे. झाडांखाली वाहने उभी करण्याचे टाळावे. समुद्रकिनारी तसेच पाणथळ भागात जाणे टाळावे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माध्यमांद्वारे



प्रसारित करण्यात येणाऱ्या सूचना व इशाऱ्यांचे पालन करावे. प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १९१६ या मदतसेवा क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन करण?यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेसह विविध यंत्रणांचे सुमारे १५ हजार अधिकारी व कर्मचारी आपापल्या कार्यक्षेत्रात (ऑन ग्राउंड) अहोरात्र कार्यरत आहेत. वरिष्ठ अधिकारीदेखील प्रत्येक घडामोडीवर सातत्याने बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या उपाययोजनांचे समन्वयन करीत आहेत. मुंबईत रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. मुंबईतील अंधेरी मिलन सबवे, कुर्ला, चुनाभट्टी, घाटकोपर, सायन प्रतिक्षानगरसह अनेक ठिकाणी पाणी तुंबले आहे. या पाण्यातूनच मुंबईकरांना वाट काढून जावं लागत आहे.

## आई फोन का नाही उचलत! लेकीची चिंता वाढली, नातेवाईकांना दिसले गंभीर दृश्य



प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** मलबार हिल आणि ट्रॉम्बे येथे रविवारी हत्येच्या दोन घटना घडल्या. नेपियन्सी रोड भाड्याने राहणाऱ्या तरुणाने शेजारी महिलेची गळा दाबून हत्या केली. तर चिता कॅम्प येथे मंदिरातील आर्थिक व्यवहारातून झालेल्या वादातून दोघांनी एका तरुणाला पेव्हर ब्लॉकने मारले

नेपियन सी रोड येथील शिमला नगर वस्तीत राहणाऱ्या ज्योती पवार (५५) या महिलेची बॉडी राहत्या घरी शनिवारी मलबार हिल पोलिसांना आढळली. शवविच्छेदनामध्ये ज्योती यांची गळा आवळून हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. याबाबत हत्येचा गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. घरकाम करणाऱ्या ज्योती पवार यांना त्यांचे कुटुंबीय वारंवार फोन करत होते मात्र शनिवारी कॉल्सना प्रतिसाद न दिल्याने दहिसर येथे राहणारी त्यांची कन्या एकता जाधव यांना चिंता वाटू लागली. कारण त्यांच्या आईची दिनचर्या निश्चित होती आणि त्या फोनला प्रतिसाद देत नव्हत्या. नातेवाईक पवारांच्या निवासस्थानी पोहोचले असता त्यांना खोली आतून बंद असल्याचे आढळले. आत प्रवेश केल्यावर, ज्योती त्यांना मृतावस्थेत आढळल्या. त्यांच्या मानेवर जखमेच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. या घटनेची माहिती मलबार हिल पोलिसांना देण्यात आली. तपास अधिकाऱ्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले, शेजाऱ्यांकडे चौकशी केली आणि गुन्ह्याच्या सुमारास चाळीत आलेल्या व्यक्तींची पडताळणी केली. तपासादरम्यान, मोहम्मद कैफ याच्या जबाबात विसंगती आढळल्याने पोलिसांचा त्याच्यावर संशय बळावला. त्यांनी त्याला या गुन्ह्याशी जोडणारे तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुरावे गोळा केले. पोलीस तपासादरम्यान त्यांच्या घरी भाड्याने राहणाऱ्या मोहम्मद खैफ शेख (२३) याने हा गुन्हा केल्याचे स्पष्ट झाले. पवारांची सोन्याची चेन लंपास करुन तो पळाला. हत्येनंतर शहराबाहेर पसार होण्याच्या प्रयत्नात असलेल्या शेख यास पोलिसांनी रविवारी अटक केली. त्याने सांगितले की, त्याला अलिकडेच त्याच्या छोट्या व्यवसायात नुकसान झाले होते आणि तो आर्थिक अडचणींचा सामना करत होता. पवार गळ्यात सोन्याची चेन घालतात हे त्याला ठाऊक होते. काही कारण काढून तो पवारांच्या घरात शिरला. त्यांचा गळा दाबून जीव घेतला आणि सोन्याची चेन खेचून परागंदा झाला. या प्रकरणाचा तपास सुरू आहे, असे उपआयुक्त आर. रागसुधा यांनी सांगितले. दुसरीकडे, ट्रॉम्बेच्या चिता कॅम्प परिसरात असलेल्या मंदिरातील आर्थिक व्यवहाराच्या वादातून शिवप्रसाद आणि हरिप्रसाद या भावांमध्ये वाद झाला. यावेळी त्याठिकाणी पोहोचलेल्या शरदकुमार याने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता दोघे भाऊ त्याच्यावरच चिडले आणि वाद घालू लागले. या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. शिवप्रसाद आणि हरिप्रसाद यांनी शरदकुमारला पेव्हर ब्लॉकने मारले. यात गंभीर जखमी झालेल्या शरदकुमार याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गोरेगाव पश्चिमेला लिंक रोड असलेल्या नाल्यात रविवारी दुपारी एक शव सापडले. मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. हा व्यक्ती नाल्यात पडला, की त्याची हत्या करण्यात आली, याबाबत तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

## वेगवान वंदे भारतमुळे उड्डाणपुलावर फवारे?

♦ परस्पर विरोधी दाव्यांनी संभ्रम

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** मुसळधार पावसामुळे रेल्वे रुळांवर पाणी साचल्याने वाहतूक मंदावली असतानाच वंदे भारत वेगाने रुळांवरील पाणी कापत जात असल्याची चित्रफीत समाज माध्यमावर सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. ही चित्रफीत कृत्रिम प्रज्ञेवर (एआय) आधारित असल्याचे मध्य रेल्वेने स्पष्ट केले असतानाच पश्चिम रेल्वेने मात्र इन्स्टाग्रामच्या आपल्या अधिकृत खात्यावर ही चित्रफित दाखवत त्यास 'वंदे भारत रॉक्स...', अशी ओळ दिली आहे. रेल्वेच्या दोन्ही विभागांच्या या परस्परविरोधी दाव्यांमुळे चित्रफितीच्या सत्यतेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कांजुरमार्ग ते विक्रोळीदरम्यान असलेल्या उड्डाणपुलाखालील रुळांवर साचलेल्या पाण्यातून भगव्या रंगाची 'वंदे भारत' वेगाने जात असल्याची चित्रफित समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाली. 'वंदे भारत'चा वेग एवढा



की, त्यामुळे साचलेल्या पाण्याचा फवारा थेट उड्डाणपुलावरील दुचाकी, चारचाकींवर उडाल्याचे चित्र आहे. या चित्रफितीबाबत मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी (सीपीआरओ) डॉ. स्वप्नील निला यांच्याकडे विचारणा केली असता 'वंदे भारतच्या चित्रफितीतील उंची आणि पोहोच यांचा मेळ बसत नाही. पाणी दोन्ही बाजूंनी वाहताना दिसायला हवे. मात्र, ते एकाच दिशेने वाहताना दिसत आहे. तसेच उंचीही वास्तवाशी जुळत नाही, त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून हे तयार केल्याचे वाटते', असे त्यांनी सांगितले. पश्चिम रेल्वेने इन्स्टावर व्हिडिओ टाकला. मध्य रेल्वेच्या स्पष्टीकरणातून चित्रफितीवर पडदा पडत असतानाच पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांच्यासह विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) यांच्या इन्स्टाग्राम खात्यावरून ही चित्रफीत दाखवत त्याखाली ओळ देण्यात आली आहे.परंतु ही चित्रफित खरी की खोटी, याबाबत वक्तव्य करणे त्यांनी टाळले. त्यामुळे नेटकऱ्यांमध्ये संभ्रम आहे. मुंबईतील प्रवास वेगवान होण्यासाठी राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेने मार्च २०२४ पासून टप्प्याटप्याने सुरू केलेल्या मुंबई सागरी किनारा मार्गाच्या बोगद्यात पावसामुळे गळती होत असल्याचे दिसून आले. हजारो कोटी रुपये खर्चुन उभारण्यात आलेल्या या मार्गाच्या बोगद्यातील सांध्यांमधून गळती होऊ लागली आहे. ही गळती निदर्शनास येताच मुंबई महापालिकेकडून रविवारी तातडीने मलमपट्टी सुरू करण्यात आली. सेवेत आल्यानंतर दोन ते अडीच महिन्यांनीच या मार्गातील बोगद्याची दुर्दशा उघडकीस आली होती व बोगद्याच्या एका ठिकाणी गळती लागून पाणी झिरपू लागले होते. तेव्हाही डागडुजी करून ही गळती थांबवण्यात आली होती. मात्र पुन्हा एकदा बोगद्यातील सांध्यांमधून गेल्या दोन-तीन दिवसांपासून गळती सुरू झाली. महापालिकेला ही बाब निदर्शनास येताच त्यांनी कंत्राटदाराच्या मदतीने गळती थांबवण्यासाठी रविवारी तातडीने काम हाती घेतले. सांध्यातील गळती थांबवण्यासाठी विशिष्ट प्रकारचे पॉलिमर ग्राऊंटिंग इंजेक्शनचा वापर करण्यात आला. सर्व सांध्यांमधून होणारी गळती या इंजेक्शनमुळे थांबवण्याचे प्रयत्न सुरू होते, असे सांगितले.

## अभिनेता धर्मेंद्र यांच्या घराजवळ मोठी दुर्घटना टळली, वादळी पावसात अचानक काय झालं?

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** राज्यभरात पावसाने चांगलाच जोर धरला असून गेल्या तीन दिवसांपासून पावसाच्या धारा अविरत कोसळत आहे. यामुळे अनेक भागांत पाणी साचलं असून मुंबईलाही जोरदार पावसाचा बराच फटका बसला आहे. एकीकडे सततच्या पावसामुळे मिसिंग लिंकवर दरड कोसळल्याने रस्ते मार्ग ठप्प झाला तर रेल्वे मार्गावरही दरड आल्याने मुंबई-पुणे रेल्वे सेवाही ठप्प झाली. तसेच मुसळधार पाऊस आणि त्यानंतर आलेल्या जोरदार पाण्याच्या प्रवाहामुळे कर्जत–खोपोली दरम्यानच्या रेल्वेमार्गावरील खडीचा थर वाहून गेसल्याने तेथील रेल्वे सेवाही ठप्प झाली आहे. तिन्ही बाजूनही पावसाच फटाक बसत असतानाच मुंबई आणि उपनगारमत पावसामुळे अनेक दुर्घटनाही घडताना दिसत आहेत. कित्येक ठिकाणी झाडं कोसळल्याच्या, झाडांच्या फांद्या पडल्याच्या घटना घडल्या आहेत. गेल्या आठवड्यात चेंबूर येथे शाळेच्या बसवर झाड कोसळून अनेक विद्यार्थी जखमी झाले तर एका विद्यार्थ्याला जीव गमवावा लागला. त्याची धास्ती अजून लोकामच्या मनात कायम असतानाच आता आता जुहू येथेही मोठी दुर्घटना होता होता टळली.ष्काल रात्रीपासून मुंबईत झालेल्या जोरदार पाऊस आणि वाऱ्यामुळे जुहूमध्ये एक मोठा अपघात टळला आहे. जुहूतील एनएस रोडवर अभिनेता धर्मेंद्र यांच्या घराजवळ एका झाडाची मोठी फांदी अचानक कोसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ही फांदी काल रात्री झालेल्या मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे तुटून पडली होती. मात्र सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. ज्या ठिकाणी ही फांदी पडली, त्या ठिकाणापासून अवघ्या थोड्याच अंतरावर अभिनेते धर्मेंद्र आणि अजय देवगन यांचे घर आहे. ही फांदी कोसळली ,मात्र त्यात कोणतीही जीवितहानी झाले नाही वा कोणी जखमीही झालं नाही. मात्र असं असलं तरी फांदी कोसळून बराच काळ झाला असल तरी, ही फांदी हटवण्यासाठी बीएमसीचा कोणताही कर्मचारी घटनास्थळी पोहोचलेला नाही. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून लवकरचा लवकर ती फांदी हटवण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. दुसरीकडे मुंबई पासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या ठाण्यात गेल्या २४ तासांमध्ये १८६ तक्रारी आपत्ती व्यवस्थापन कक्षाला प्राप्त झाल्या.

## आधीच आभाळ फाटलं, आता उपाशी राहण्याची वेळ, डबेवाल्यांचा एक निर्णय अन् मुंबईकरांचे हाल होणार?

प्रतिनिधी ६ जुलै

**मुंबई :** मुंबईत बरसणाऱ्या पावसाने कहर माजवला आहे. गेल्या चार दिवसांपासून बरसणाऱ्या पावसाचा फटका मुंबईकरांना देखीलबसला आहे. मुसळधार पाऊस सुरु असताना मुंबईच्या डबेवाल्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहता संघटनेने मोठा निर्णय घेतला आहे.

मुंबईला गेल्या ४ दिवसांपासून पावसाने चांगलंच झोडपलं आहे. मुसळधार सुरु असलेला पाऊस विश्रांती घेण्याचं नाव देखील घेत



नाहीये. अनेक ठिकाणी पाणी गुडघ्यांपर्यंत भरलं आहे तर, रेल्वे ट्रॅकवर पाणी भरलं आहे. अशात डबेवाल्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे अनेकांवर उपाशी राहण्यची वेळ येणार आहे. सोमवारी मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे डबेवाल्यांनी आज डबे पोहोचवण्याची सेवा बंद ठेवली आहे. मुंबईत पावसाचा जोर कायम आहे. अनेक ठिकाणी पाणी भरलं आहे. झाडं उन्मळून पडली आहेत. रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे. ज्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**आज मुंबईच्या डबेवाल्यांची सेवा बंद**

मुसळधार पाऊस आणि पाणी साचल्यामुळे मुंबईतील डबेवाल्यांची सेवा आज बंद राहणार आहे. डबेवाला असोसिएशनचे अध्यक्ष उल्हास मुके यांनी सांगितल्यानुसार, मुसळधार पावसामुळे विरार-वसई भागातील अनेक डबेवाल्यांच्या घरांमध्ये पाणी शिरले आहे. १२५ वर्षांची परंपरा असली तरी कर्मचाऱ्यांची सुरक्षितता हीच सर्वोच्च प्राथमिकता आहे, यावर असोसिएशनने भर दिला; त्यामुळेच खबरदारीचा उपाय म्हणून आज सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135